# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०६/०६/२०२४ (गुरूवार)

---

## पो.स्टे. मौदा हद्दीत जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०५/०६/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा चिरवा गावात पानमारा रोडवर रोडच्या बाजूला करंजिच्या झाडाखाली काही इसम ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे मौदा हद्दीत चिरवा गावात पानमारा रोडवर रोडच्या बाजूला करंजिच्या झाडाखाली रेड केली असता काही इसम हे ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना दिसुन आले. त्यामध्ये **आरोपी नामे— १) शंकर गोमाजी आंबुलकर, वय ४२ वर्ष, २) प्रविण प्रभाकर ठवकर, वय २९ वर्ष, ३) राजहंस सहदेव काटोले, वय ४० वर्ष, ४) आनंदराव रमेश बांते, वय ३७ वर्ष, ५) रोहिदास मोतीराम शहारे, वय ५८ वर्ष ६) सुधाकर वासुदेव बांते, वय ४२ वर्ष ७) परसराम किसनाजी ठोंबरे, वय ४२ वर्ष सर्व रा. चिरवा ता. मौदा ८) विक्की रामभाउ कामडी, वय २६ वर्ष रा. गणेश अपार्टमेंट साईनगर दिघोरी नागपूर** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातील व डावावरील असे एकुण ३७८०/—रू. चा मुद्देमाल व ५२ ताशपत्ते जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंह राजपूत, पोउपनि अरविंदकुमार जगने, पोहवा भगवान चांदेवार, पोना श्रीराम डोईफोडे, पोना रोशन पाटील, पोना तुषार कुडुपले, पोशि प्रज्वल नंदेश्वर यांनी पार पाडली.

## पो.स्टे. जलालखेडा हद्दीत सट्टापट्टी जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०५/०६/२०२४ रोजी पोस्टे जलालखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, जलालखेडा हद्दीमध्ये भारसिंगी नरखेड येथे काही इसम लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे जलालखेडा हद्दीत जुगार खेळ खेळविणारे **आरोपी नामे— १) लिलाधर उकटराव सोनबरसे, वय ४७ वर्ष, रा. भारसिंगी ता. नरखेड जि. नागपूर २) अमोल ठोंबरे, रा. अमनेर ता. वरूड, जि. अमरावती ३) सुनिल सुखदेव धवराळ, वय ४३ वर्ष, रा. भारसिंगी ता. नरखेड जि. नागपूर** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातील नगदी २८८०/—रू. व सट्टापट्टी आकडे लिहीलेला कागद जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे जलालखेडा येथे कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम, सहकलम १०९ भादंवि. प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे जलालखेडा येथील ठाणेदार सि. व्ही. चव्हान, पोलीस उपनिरीक्षक पपीन रामटेके, पोना हिरूडकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर